मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून करण्यात आलेले रस्ते पाच वर्षानंतर देखभाल दुरुस्तीसाठी जिल्हा परिषदेकडे हस्तांतरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः विसआ २०१६/ प्र.क्र. ७/ पंरा ७
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई- ४०० ००१
दिनांक: ७ ऑक्टोबर,२०१७

वाचा :-

शासन निर्णय ग्रामविकास विभाग क्रमांकः ग्रासयो२०१५/प्र.क्र.१२/योजना-९,दि. २८/१०/२०१५

प्रस्तावना :-

राज्यात मुख्यमंत्री ग्रामसडक योजना संदर्भांकीत क्र.१ च्या शासन निर्णयान्वये सुरु करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत जिल्हा परिषद अखत्यारित असलेल्या इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्गांचे या योजनेंतर्गत तयार केलेल्या रस्त्यांचा दोष उत्तरदायित्व कालावधी (Defect Liability Period) पाच वर्षाचा ठरविण्यात आला असून सदर कालावधीत रस्त्याची देखभाल दुरुस्ती संबंधित कंत्राटदारांकडून करण्यात येते. त्यामुळे या योजनेंतर्गत तयार करण्यात आलेल्या रस्त्यांचा ५ वर्षाचा कालावधी समाप्त झाल्यानंतर देखभाल व दुरुस्तीसाठी सदर रस्ते जिल्हा परिषदेकडे सुपूर्द करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत करण्यात आलेल्या रस्त्यांचा पाच वर्षाचा दोष उत्तरदायित्व कालावधी (Defect Liability Period) संपल्यानंतर त्या रस्त्यांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी सदर रस्ते संबंधित जिल्हा परिषदेकडे हस्तांतरीत करण्यास व संबंधित जिल्हा परिषदेने सदर रस्त्यांची आवश्यकतेनुसार देखभाल व दुरुस्ती करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०९१८१६२६४८४६२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

R A Nagargoje

Digitally signed by R A Nagargoje
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=RDD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=decff3a81eacee2237c8c2d29460e7c459d9f7baaab677f7578d952747d49ab2, cn=R A Nagargoje
Date: 2017.10.07 16:01:33 +05'30'

(र.आ.नागरगोजे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. पालकमंत्री सर्व जिल्हे
२. विरोधी पक्षनेता (विधानसभा / विधानपरिषद)
३. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
४. मा.सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना
५. सर्व जिल्हाधिकारी
६. मुख्य अभियंता , प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, पुणे
७. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
८. सर्व अधिक्षक अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना
९. उपसचिव (मु.मं.ग्रा.स.यो / प्र.मं.ग्रा.स.यो.)
१०. सर्व कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना
११. सर्व कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद
१२. कार्यासन अधिकारी, बांधकाम-३
१३. निवड नस्ती, बांधकाम-४, ग्राम विकास विभाग.